नियमित दिवाणी मुकदमा क्र.८३/२०१३
नि. ११४ लगत

<u>शपथेवर सुरू</u>

<u>पुढील सरतपास प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एस्.जी.बांवकर यांचेमार्फत</u>

१९. मला आता नि. ४२ चे कुलअखत्यारपत्र दाखवले. ते कुलअखत्यारपत्र मला प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र.२ यांनी दिनांक १७/०३/२०१५ रोजी करून दिलेले आहे. त्यावर माझी व प्रतिवादी क्र. १ व २ यांची सही, अंगठा व छायाचित्र असून त्यावर ॲड. व नोटरी एम्.ए. गौतम यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

<u>उलटतपास वादीकरीता विधिज्ञ श्री. एम्.आय. सय्यद यांचेमार्फत</u>

२०. कुलअखत्यारसाठीचा मुद्रांक कागद मुंबई येथे खरेदी केला होता. तो मुद्रांक कागद वकीलांतर्फे आम्ही विकत घेतला होता. माझे लग्नापूर्वीचे नांव किशोरी आत्माराम सोनुर्लेकर असे आहे. ते कुलअखत्यारपत्र हे मला ज्या मिळकतींचे करून दिले होते त्यातील जुना स.क्र. २४७ चे क्षेत्र २८ गुंठे व स.क्र. २४८ चे क्षेत्र १९ गुंठे असे आहे. माझ्या दोन मोठया बहिणी म्हणजेच प्रतिवादी क्र. १ व २ या दोन्ही एकाच घरात दिलेल्या आहेत. ते कुलअखत्यारपत्र आम्ही ॲड. एस्. एस्. सावंत यांच्याकडून करून घेतले व नंतर मुंबईला घेवनू गेलो. साक्षीदार म्हणून कुलअखत्यारपत्रावर स्वाक्षरी सावंतवाडी येथेच घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही केवळ मुंबईला अखत्यारपत्र पुर्ण केले.

२१. हे म्हणणे खरे आहे की, माझे इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण मळगांव हायस्कुल येथे झाले. माझ्या जन्मापासून ते लग्न होईपर्यत मी मळगांव येथे रहात होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न होईपर्यतच्या आमच्या घरातील ज्या—ज्या घटना घडल्या त्या मला माहिती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नासाठी आमची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे माझ्या आईने दावा मिळकती वादी यांना विक्री करण्याचा त्यांच्यासोबत विक्री करार केला होता.

२२. मी फेरफार नोंद क्र. ११९ पाहिलेला मला आठवत नाही. जी.जी.पंगेरकर म्हणजे गुरूदास पंगेरकर हे आहेत. ते माझ्या बहिणीचे पती आहेत. मला आता नि. १०८ कडील कुलअखत्यारपत्र दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर प्रतिवादी क्र.१ शुभांगी पंगेरकर यांचा अंगठा, प्रतिवादी क्र.२ स्मिता पंगेरकर यांची सही व माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर साक्षीदार म्हणून माझ्या बहिणीचे पती गुरूदास पंगेरकर यांची सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते अखत्यारपत्र नोटरी श्री. गायतोंडे यांच्यासमोर पूर्ण केलेले आहे. मला आता नि. १०७ कडील हक्कसोडपत्र दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, ते हक्कसोडपत्र मी व माझ्या दोन बहिणींनी माझ्या आईच्या लाभात करून दिले होते. नि. १०७ व १०८ या विरूध्द आम्ही आजतागायत कोठेही फौजदारी कारवाई केलेली नाही. साक्षीदार सांगते की, त्या कागदांबाबत मला काही माहिती नाही.

२३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने उपविभागीय अधिकारी यांच्याकडून दावा मिळकत ही कुळ कायदयाअन्वये मिळालेली मिळकत असल्यामुळे तिच्या विक्रीसाठी परवानगी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे नांव सातबारा उता—याला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत झाले म्हणून वादीचे नांव सातबारा उता—याला आले. हे म्हणणे खरे नाही की, नि.०८ च्या करारपत्रानुसार दावा मिळकती आम्ही वादीच्या ताब्यात दिल्या. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हापासून वादीने दावा मिळकतीमध्ये झाडांची लागवड केलेली आहे. आम्ही दावा मिळकतीत झाडांची लागवड केली याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, संपूर्ण दावा मिळकत वादीच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने आम्हाला दोन वेळा पत्र पाठवून ती जमीन त्यांना विक्री करा असे कळवले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दावा मिळकत विक्री करावयाची म्हणून वृत्तपत्रात जाहीर नोटीस दिली होती. आम्ही दैनिक 'तरूण भारत' या वृत्तपत्रातून आमची मिळकत सांभाळावी यासाठी नोटीस दिली होती. ती मिळकत आम्ही पेडणेकर या व्यक्तीला संभाळण्यास दिली. हे म्हणणे खरे आहे की, तरूण भारत या वृत्तपत्रातील नोटीस दिल्यानंतर दावा मिळकत ही आम्ही संभाळण्यासाठी पेडणेकर यांना दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती व्यतिरिक्त आमच्या मळगांव येथे आणखी मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे असलेले घर पडलेले आहे. साक्षीदार सांगते की, त्या घराच्या जागेवर सध्या माझे भाउ नविन बांधकाम करीत आहेत. मला सख्खे भाउ नाहीत. त्या मिळकतीत माझ्या काकांची मुले सुधाकर सोनुर्लेकर हे घर बांधित आहेत. सध्या ज्या घराचे बांधकाम चालू आहे त्या

मिळकतीचा सर्वे क्रमांक व हिस्सा क्रमांक मला आता आठवत नाही. ते घर बांधण्यासाठी सुधाकर सोनुर्लेकर याने परवानगी घेतली होती. ती परवानगी मी दाव्यात हजर करण्यास तयार आहे.

२४. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला पैशाची हाव सुटल्यामुळे कुलअखत्यारपत्र केले नाही, हक्कसोडपत्र केले नाही व जमीन वादीला विकली नाही असे मी खोटे सांगत आहे. आमच्या घराचा नंबर मळगांव ग्रामंपचायत घर क्र. ४४० असा होता की नाही हे मला आठवत नाही. घर क्र. ४४० हे स.क्र. १३४ व १३६ मधील आहे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे आम्ही ती जमीन विक्री करण्यासाठी 'तरूण भारत' या वृत्तपत्रातून जाहिरात दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे कैफियतीतील व शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

(एम्. एस्. बुधवंत)

दिनांक :—०४/०४/२०१९. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.